महाराष्ट्र टाईम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

27 APR 2018

# विद्यापीठ करणार एसएसबीसाठी मार्गदर्शन

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

'सेनादलामध्ये अधिकारीपदी भरतीसाठी आवश्यक असणाऱ्या सर्व्हीस सिलेक्शन बोर्ड (एसएसबी) परीक्षांसाठी शिवाजी विद्यापीठात मार्गदर्शन कक्ष सुरू करू' असा मनोदय कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी व्यक्त केला. कुलगुरू डॉ. शिंदे यांना गुरुवारी राष्ट्रीय छात्र सेनेचे (एनसीसी) मानद कर्नलपद प्रदान करण्याचा समारंभ पार पडला. पदस्वीकृतीनंतर ते बोलत होते. व्यासपीठावर प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्यासह ब्रिगेडियर पी. एस. राणा, कर्नल एम. एम. चौधरी, मानद मेजर रुपा शहा व कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, 'विद्यापीठाने एनसीसीसाठी विद्यापीठ आवारात जागा उपलब्ध करून देऊन एनसीसीच्या उपक्रमांना चालना देण्याचे काम केले आहे. त्याचप्रमाणे पदवी स्तरावर एनसीसी हा विशेष लष्करी अभ्यासक्रमही विद्यापीठ कार्यक्षेत्रात सुरू करण्यात आला आहे. विद्यापीठात ज्याप्रमाणे यूपीएससी, एमपीएससी यांसारख्या स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शन केले जाते, त्याच धर्तीवर एसएसबी परीक्षांसाठीही मार्गदर्शन कक्ष सुरू करण्यात येणार आहे. १५ ऑगस्ट व २६ जानेवारी या राष्ट्रीय दिनांवेळी विद्यापीठ प्रांगणात एनसीसीची परेड आयोजित करण्यासंदर्भातही अधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात येईल. एनसीसीमध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने समाविष्ट होण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना आणि क्रीडा स्पर्धांत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांप्रमाणे या विद्यार्थ्यांना काही सवलती अगर अधिक गुण प्रदान करता येतील का या दृष्टीने प्रयत्न राहिल.'




कुलगुरू डॉ. देवानंद शिंदें यांना एनसीसीचे मानद कर्नलपद प्रदान करण्यात आल्यानंतर सन्मानदर्शक बॅटन प्रदान करताना ब्रिगेडियर पी. एस. राणा. सोबत (डावीकडून) कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, कर्नल एम.एम. चौधरी, रुपा शहा.

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांना एनसीसी मानद कर्नलपद

ब्रिगेडियर पी. एस. राणा म्हणाले, 'एनसीसी ही भारतीय लष्करापेक्षाही अधिक युवकांची संख्या असणारी शिस्तबद्ध संघटना असून प्रशिक्षित व देशप्रेमाने भारलेले नागरिक निर्माण करण्यासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे. या संघटनेच्या कार्याला बळकटी प्राप्त होण्यासाठी शैक्षणिक संस्था, विद्यापीठे आदी व्यवस्थांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण ठरते. विद्यापीठाच्या सामाजिक, सांस्कृतिक उपक्रमांमध्ये सहभाग प्राप्त होऊन नूतन मानद कर्नल कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या नेतृत्वाखाली परिक्षेत्रात एनसीसीची जोमाने वृद्धी होईल, अशी अपेक्षाही आहे.'

यावेळी ब्रिगेडियर राणा यांच्या हस्ते कुलगुरूंना मानद कर्नलपदाचे केंद्रीय मुख्यालयाकडून प्राप्त सन्मानपत्र व एनसीसी बॅटन प्रदान करण्यात आले. तत्पूर्वी, ब्रिगेडियर राणा आणि कर्नल चौधरी यांनी कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या कक्षापासून मुख्य प्रशासकीय इमारतीसमोरील कार्यक्रम स्थळापर्यंत त्यांना सन्मानपूर्वक पाचारण केले. तेथे एनसीसीचे छात्र व एनसीसी बँडकडून मानवंदना देण्यात आली.

कर्नल एम. एम. चौधरी यांनी स्वागत केले. प्र-कुलगुरू डॉ. शिर्के यांनी कुलगुरूंचा परिचय करून दिला. मानद मेजर शहा यांनी सन्मानपत्राचे वाचन केले. प्रा. संध्या जाधव यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांनी आभार मानले. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, डॉ. डी. आर. मोरे, निवृत्त कर्नल थोरात, प्रशिक्षक प्रा. वर्षा साठे उपस्थित होते.

27 APR 2018 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# तरुणांना लष्करी अधिकारी होण्यासाठी व्यासपीठ

**कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे**

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाचे कार्यक्षेत्र असणाऱ्या कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांत सैनिकी परंपरा आहे. त्यामुळे या भागातील तरुण मोठ्या प्रमाणावर लष्करात भरती होतात. या तरुणांना लष्करी अधिकारी होण्याच्या दृष्टीने योग्य मार्गदर्शनासाठी विद्यापीठाच्या वतीने सातारा येथील शहीद स्फूर्ती केंद्रांतर्गत सर्व्हिस सिलेक्शन बोर्ड (एसएसबी) सुरू केले जाणार असल्याची माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी गुरुवारी झालेल्या पत्रकार परिषदेत दिली.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील तरुण हे लढवय्या वृत्तीचे आहेत. त्यामुळे भारतीय सैन्यात मोठ्या संख्येने ते भरती होतात. राष्ट्रप्रेमामुळे हे तरुण सैन्यात भरती होतात. या तरुणांना सैन्यात भरतीसह लष्करी अधिकारी पदावर संधी मिळावी, यासाठी एसएसबीचे मार्गदर्शन मोलाचे ठरणार आहे. वर्षभरात यासाठी स्वतंत्र कक्ष सुरू केला जाईल. कोल्हापूर व सांगली या जिल्ह्यांत या शाखा असणार आहेत. यासह शहीद कुटुंबीयांच्या नातेवाईकांनाही शिक्षण, रोजगार आदींबाबत मदत केली जाणार आहे.




शिवाजी विद्यापीठातून

एनसीसीच्या मानद मेजर रूपा शहा म्हणाल्या, विद्यापीठाने मिलिटरी ॲकॅडमी, फायरिंग रेंज सुरू करावी. मुंबई व सोलापूर विद्यापीठांमध्ये ज्या पद्धतीने एनसीसीच्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहनात्मक दहा गुण दिले जातात. त्याच धर्तीवर आपल्याकडे ही पद्धत सुरू करावी. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, रोजगार केंद्राचे समन्वयक डॉ. जी. एस. राशीनकर, एनसीसीचे अधिकारी अमित रेडेकर, कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक प्रा. ए. एम. गुरव आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 APR 2018
Times of India

# SUK VC is now honorary colonel

TOI




Vice-chancellor Devanand Shinde being honoured on Thursday

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) vice-chancellor Devanand Shinde was conferred with the rank of honorary colonel by the National Caded Corps (NCC) on Thursday.

Brigadier P S Rana, Colonel M M Chaudhary, honorary major Rupa Shaha, SUK's pro-VC D T Shirke, and registrar Vilas Nandavadekar were present for the ceremony. "I would like to thank the NCC officials from the state and Centre for this. I am really honoured," Shinde said.

"To involve more students in the NCC, students who are in it should be felicitated for various activities round the year so that other students also get to know about it," he added.

Rana said that the NCC is a disciplined organisation that produces disciplined youths. "The NCC possesses energy to produce patriotic youths. To get more strength to this movement, contribution of educational institutes, colleges and universities plays an important role and that is why the ceremony like these are important," he said.

He added, "We are hoping that the NCC activities and overall participation of students will pick pace under the newly honoured colonel Shinde."

During the programme, Rana conferred the V-C with the certificate from the central headquarters of NCC along with a baton. Shinde also received the special salute from the NCC cadets and NCC band present at the main administrative building.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 APR 2018
Times of India

# SUK spl cell to promote career in defence

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) vice-chancellor Devanand Shinde on Thursday said they are planning development of a special counselling cell for candidates in the region aspiring to join Indian defence forces—army, navy and air force.

He said the varsity already provides different expert lectures and study centres for competitive exams such as Union Public Service Commission (UPSC) and Maharashtra Public Service Commission (MPSC). On this background, the counselling cell will work for the students who would like to pursue their career in the defence forces.

According to Shinde, the counselling cell could also prove to be a capacity building centre for the students and can fetch good results for the aspiring candidates. When asked how much time will it take to become reality, Shinde said he will have to get in touch with the higher authorities associated with the NCC and plan the whole thing. "But we would like it to become reality within a year," he said.

He added that the varsity has allotted a separate land for the NCC Bhavan on its campus and a special program for NCC candidates at the under-graduate level is also being operated which is getting a good response.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 APR 2018
सकाळ

# कामचुकारांवर शिस्तभंगाची कारवाई : कुलगुरू डॉ. शिंदे

कोल्हापूर, ता. २६ : शिवाजी विद्यापीठातील कामचुकार अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करणार असल्याचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी आज स्पष्ट केले. राष्ट्रीय छात्र सेनेतर्फे मानद कर्नलपद सोहळ्यानंतर ते आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते.

शिवाजी विद्यापीठात अनेक अधिकारी व कर्मचारी कामचुकारपणा करतात. याबाबतच्या तक्रारी प्रशासनाकडे येतात, मात्र कारवाई का केली जात नाही? या प्रश्नावर कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, ''प्रत्येकाने आपले काम जबाबदारीने केले पाहिजे. कोणी अधिकारी अथवा कर्मचारी कामचुकार करत असेल, तर ते खपवून घेतले जाणार नाही. संबंधितांवर तातडीने शिस्तभंगाची कारवाई केली जाईल. त्याचबरोबर सैन्य, नौदल आणि वायूदल अशा राष्ट्र सेवा दलात नोकरीच्या संधी आहेत. त्याचा लाभ शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विद्यार्थ्यांना घेता यावा, यासाठी एनसीसी विभागामार्फत स्वतंत्र सेल उभा करण्यात येणार आहे.''

विद्यापीठाच्या उद्योजगता विकास केंद्राच्या माध्यमातून आगामी १९ मे रोजी अधिविभाग इमारत, लोककला केंद्र येथे कौशल्य व रोजगार महामेळाव्याचे आयोजन केले आहे. यात आयटी, अभियांत्रिकी, सेवा अशा विविध क्षेत्रांतील ५० हून अधिक खासगी कंपन्या सहभागी होतील. किमान दोन हजार रोजगार उपलब्ध होणार आहेत. ३० कौशल्य प्रशिक्षकांच्या माध्यमातून १०० कौशल्य प्रकारांबाबत मार्गदर्शन देण्याचा मानस असल्याची माहिती प्रा. ए. एम. गुरव, जी. एस. राशिनकर यांनी याप्रसंगी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 APR 2018
तरुण भारत

# कामचुकार कर्मचाऱ्यांवर कारवाई करू : देवानंद शिंदे

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील कामचुकार कर्मचाऱ्यांवर कडक कारवाई केली जाईल असा इशारा कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी पत्रकारांशी बोलताना दिला. कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, कर्मचारी व प्राध्यापक यांनी अंतर्गत वाद बाजूला ठेवून काम केले पाहिजे. विद्यार्थी केंद्रबिंदू मानून विद्यापीठ प्रशासनाचा कारभार असला पाहिजे. येथून पुढे प्राध्यापक व कर्मचाऱ्यांमधील वाद उघडकीस आल्यास नवीन कायद्यानुसार कारवाई केली जाईल. तसेच विद्यापीठातील एका अधिविभागातील शिक्षिकाकडून विद्यार्थ्यांना त्रास देण्यात येत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आणले. याबाबत कोणाला सांगितल्यास विद्यार्थ्यांवर गुन्हे नोंद करण्याची धमकी संबंधित शिक्षिकेकडून दिली जात आहे. या शिक्षिकेला विभागप्रमुखही पाठीशी घालून विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांना धारेवर धरतात. याबाबत त्यांना विचारले असता संबंधीत व्यक्तीला समज देवून, योग्य ती कारवाई केली जाईल, असेही कुलगुरू डॉ. शिंदे यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 APR 2018
महाराष्ट्र टाईम्स



# विद्यापीठ करणार कामचुकारांवर कारवाई

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील कामचुकार कर्मचाऱ्यांची माहिती घेऊन त्यांच्यावर तातडीने कारवाई करण्यात येईल असे शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी गुरुवारी स्पष्ट केले. विद्यापीठातील कर्मचाऱ्यांकडून कामाबाबत सुरू असलेल्या बेजबाबदार वृत्तीमुळे अनेक विभागातील कामगाजात गोंधळ होत असल्याच्या वाढत्या तक्रारींबाबत पत्रकारांशी संवाद साधताना डॉ. शिंदे यांनी भूमिका स्पष्ट केली. तसेच विद्यापीठातील एका विभागातील महिला प्राध्यापिकेकडून विद्यार्थ्यांना त्रास दिला जात असल्याची तक्रार कुलगुरूंसह सल्लागार डॉ. डी. आर. मोरे यांच्याकडे दाखल केली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 APR 2018
पुढारी

# विद्यापीठातील कामचुकारांवर कारवाई होणार

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील कामचुकार अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई केली जाईल, अशी माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी गुरुवारी झालेल्या पत्रकार परिषदेत दिली. याबाबतचा प्रश्न पत्रकारांनी विचारला असता ते बोलत होते. शिवाजी विद्यापीठात काम करणारे (केके) आणि फुशारक्या मारणारे (एफएम) असे दोन वर्ग आहेत. या दोन्ही वर्गांना केके आणि एफएम गट असेच ओळखले जाते. सातत्याने चुका करूनही अधिकाऱ्यांच्या वरदहस्तामुळे अनेकांना पाठीशी घातले जात असल्याचे प्रकार वारंवार दिसून येत असल्याबाबत पत्रकारांनी विचारले असता, कुलगुरू डॉ. शिंदे यांनी याबाबत शिस्तभंगाची कारवाई केली जाईल, असे स्पष्ट केले.

27 APR 2018
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात मिळणार रेशीमशास्त्राचे धडे



## रेशीमशास्त्र पदविका व रेशीमशास्त्र पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमाचे प्रवेश फुल्ल, आठवी उत्तीर्ण शेतकऱ्यांना मिळणार प्रवेश

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील प्राणीशास्त्र अधिविभागात रेशीम उद्योग करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी 'रेशीमशास्त्र पदविका अभ्यासक्रम' (मराठी माध्यम) व रेशीमशास्त्र पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम (इंग्रजी माध्यम) सुरु करण्यात आला आहे. भारतात प्रथमच हा अभ्यासक्रम शिवाजी विद्यापीठात सुरू करण्यात आला आहे. या अभ्यासक्रमांतर्गत रेशीम उद्योग करणाऱ्या शेतकऱ्यांना तुती लागवडीपासून ते तयार झालेल्या रेशीमची बाजारपेठेत विक्री कशी केली पाहिजे, इथपर्यंत सगळ्या गोष्टींचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. त्यामुळे पश्चिम महाराष्ट्रातील रेशीम शेती करणाऱ्या शेतकऱ्यांनी रेशीमशास्त्र पदविका अभ्यासक्रमाचे ज्ञान प्राप्त केल्यास, त्यांच्या रेशीमवस्त्र उद्योगाला आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत प्रतिष्ठा व दर मिळणार आहे.



### पदव्युत्तर पदविका प्रवेशासाठी अटी

- कला, वाणिज्य, विज्ञान कोणत्याही शाखेचे पदवी प्रमाणपत्र
- इतर अधिविभागात प्रवेश घेतला असल्यास डबल डिग्री करण्यासाठी या अभ्यासक्रमाला प्रवेश घेता येतो.
- आधारकार्ड
- १० हजार रुपये प्रवेश शुल्क
- प्रवेश क्षमता ४०

### रेशीमशास्त्र पदविका अभ्यासक्रम (मराठी माध्यम)

- खाद्यवनस्पती लागवड आणि व्यवस्थापन
- रेशीम कीटक संगोपन, रेशीम शेती व्यावसायातील आरोग्यविषयक समस्या आणि व्यवस्थापन
- रेशीम अंडीपुंज निर्मिती, धागा निर्मिती, अर्थशास्त्र आणि रेशीम शेतीतील मूल्यवर्धन
- रेशीम कीटक, खाद्य वनस्पती, कीड व रोग व्यवस्थापन
- प्रत्येक पेपरला १०० गुण एकूण ४०० गुणांचा पदविका अभ्यासक्रम

### रेशीमशास्त्र पदव्युत्तर पदविका (इंग्रजी माध्यम)

- खाद्यवनस्पती लागवड आणि व्यवस्थापन
- रेशीम किटक संगोपन, रेशीम शेती व्यवसायातील आरोग्यविषयक समस्या आणि व्यवस्थापन
- रेशीम अंडीपुंज निर्मिती, धागा निर्मिती, अर्थशास्त्र आणि रेशीम शेतीतील मूल्यवर्धन
- रेशीम कीटक, खाद्य वनस्पती, कीड व रोग व्यवस्थापन
- प्रत्येकी १०० गुण व २०० गुणांसाठी प्रोजेक्ट एकूण ६०० गुणांचा पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम

### रेशीमशास्त्र पदविका प्रवेशासाठी अटी

- पदविका अभ्यासक्रमासाठी आठवी उत्तीर्ण शैक्षणिक पात्रता
- तीन वर्षे रेशीम शेतीचा अनुभव असल्यास प्राधान्य
- जिल्हा रेशीम कार्यालयाकडून रेशीमशेती अनुभव दाखला
- आधार कार्ड
- १० हजार रुपये प्रवेश शुल्क
- प्रवेश क्षमता ४०
- शनिवार व रविवार दोन दिवस ३ तास या अभ्यासक्रमाचे वर्ग राहणार सुरू

### अभ्यासक्रमाची वैशिष्ट्ये

- शेतकरी पूर्वीपासून रेशीम शेती करीत असले तरी या अभ्यासक्रमातून रेशीम शेतीची शास्त्रीय माहिती मिळणार आहे.
- शास्त्रीय बारकावे व महत्त्व समजल्याने रेशीमकोष उत्पादनाची गुणवत्तेत वाढ होणार आहे.
- कोष विक्री व्यवस्थापन शास्त्रीय पद्धतीने केल्यास बाजारात कोष दरात वाढ होणार.
- रेशीम उद्योग करणारे शेतकरी आत्मविश्वासाने भारताबरोबर परदेशातील बाजारपेठेतही कोषांची विक्री करतील.
- रेशीम आळ्यांचे संगोपन, शास्त्रीय व्यवस्थापन तसेच तुतीवरील रोग व कीड, रेशीम आळ्यावरील रोग व कीड यांचे व्यवस्थापन प्रभावीपणे करता येणार
- रेशीम कीड व रोगांची ओळख होऊन तातडीने उपाययोजना करण्यासंदर्भात मार्गदर्शन.
- प्राणीशास्त्र, वनस्पतीशास्त्र, कॉमर्स मॅनेजमेंट व कला शाखेतील विद्यार्थ्यांना स्वत:चा उद्योग सुरू करण्यास शास्त्रीय ज्ञान उपलब्ध होणार.
- केंद्र व राज्य शासनाच्या रेशीम विभागात रेशीमशास्त्र पदव्युत्तर पदविका प्रमाणपत्राला विशेष प्राधान्य आहे.
- नोकरीच्या शोधात वेळ वाया न घालवता व्यवसायिक अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर कौशल्यावर आधारित नावीन्यपूर्ण रेशीम शेती उद्योग सुरू करता येतो.
- कोल्हापूर, सातारा, सांगली, बीडसह संपूर्ण महाराष्ट्रातून प्रवेशासाठी विद्यार्थी.

### रेशीम उद्योगाला आंतरराष्ट्रीय दर्जा प्राप्त होईल

शेतकऱ्यांचे हित लक्षात घेऊन विद्यापीठाने हा अभ्यासक्रम तयार केला आहे. या अभ्यासक्रमात 'तुतीची लागवड', 'रेशीम कीटकांचे संगोपन', 'तुती व रेशीम कीटकांचे रोग आणि किडींचे व्यवस्थापन', 'बाजारपेठ आणि कोष विक्री व्यवस्थापन', 'रेशीम धागा आणि कापड निर्मिती', या प्रमुख विषयांचा समावेश आहे. शेतकऱ्यांच्या व्यथा ऐकूनच डॉ. ए. ए. जाधव व विभागप्रमुख डॉ. पी. डी. यादव यांच्या संकल्पनेतून हा अभ्यासक्रम तयार केला आहे. यातूनच शेतकऱ्यांच्या रेशीमवस्त्र उद्योगांना आंतरराष्ट्रीय दर्जाही मिळण्याची शक्यता आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 APR 2018
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात १९ मे रोजी रोजगार महामेळावा



▶कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांची माहिती

▶५० हून अधिक कंपन्यांचा सहभाग

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र व केंद्रीय रोजगार कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने १९ मे रोजी कौशल्य व रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा मेळावा लोककला केंद्रात होणार असून, विविध क्षेत्रातील ५० हून अधिक कंपन्या सहभागी होणार आहेत. २ हजार विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी मिळेल, अशी माहिती पत्रकार परिषदेत कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी दिली.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, कोल्हापूर, सांगली, सातारा या तिन्ही जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी मिळावी म्हणून कौशल्य व रोजगार मेळाव्याचे आयोजन केले आहे. या मेळाव्यात उद्योजक, सॉफ्ट स्किल आदी विषयांवर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. इच्छुकांनी नावनोंदणी करावयाची आहे. कृषी अभियांत्रिकी, आय. टी., बी. पी. ओ., सेवा क्षेत्र, प्रशासन, विमा व बँकिंग आदी क्षेत्रातील विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी मिळेल. तरी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. शिंदे यांनी केले.

यावेळी प्र कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, एनसीसीप्रमुख डॉ. डी. के. गायकवाड, क्रीडा विभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, प्रा. ए. एम. गुरव, डॉ. जी. एस. राशीनकर आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 APR 2018
पुढारी

# विद्यापीठात १९ मे रोजी महारोजगार मेळावा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र व केंद्रीय रोजगार कक्षाच्या वतीने १९ मे रोजी महारोजगार मेळाव्याचे आयोजन केले असल्याची माहिती केंद्र समन्वयक प्रा. ए. एम. गुरव आणि डॉ. जी. एस. राशीनकर यांनी दिली. या मेळाव्यास राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील पन्नासहून अधिक कंपन्या सहभागी होणार आहेत. यामध्ये वीस स्थानिक कंपन्या असणार आहेत. हा सर्वात मोठा मेळावा असून मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांना या माध्यमातून रोजगार मिळण्याची शक्यता असल्याचेही सांगण्यात आले.

27 APR 2018
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**देवानंद शिंदे :** शिवाजी विद्यापीठात शहीद स्फूर्ती केंद्रांतर्गत उपक्रम; 'एनसीसी'च्या छात्रसैनिकांना प्रोत्साहन देणार

# 'एसएसबी' मार्गदर्शन कक्ष सुरु करणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शहीद जवानांच्या सन्मानार्थ शिवाजी विद्यापीठाने सातारा येथे शहीद स्फूर्ती केंद्र सुरु केले आहे. या केंद्रांतर्गत आता सर्व्हिस सिलेक्शन बोर्डाच्या परीक्षांबाबतचा (एसएसबी) मार्गदर्शन कक्ष सुरु केला जाईल. राष्ट्रीय छात्रसेनेच्या (एनसीसी) राज्य, राष्ट्रीय पातळीवरील शिबिर, संचलनामध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या छात्रसैनिकांना प्रोत्साहन देणारे उपक्रम विद्यापीठातर्फे राबविले जाणार आहेत, अशी माहिती कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी गुरुवारी येथे पत्रकार परिषदेत दिली.

'एनसीसी'चे कर्नल कमांडंट हे 'मानद कर्नल'पद स्वीकारल्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. कुलगुरु डॉ. शिंदे म्हणाले, 'एसएसबी'द्वारे परीक्षांच्या माध्यमातून सेनादलातील अधिकारी ते विविध पदांवर काम करण्याची संधी मिळते. ते लक्षात घेऊन येत्या वर्षभरात शहीद स्फूर्ती केंद्रांतर्गत एमपीएससी, यूपीएससीच्या धर्तीवर विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विद्यार्थी-विद्यार्थिनींना 'एसएसबी'बाबत मार्गदर्शन करणारा स्वतंत्र कक्ष सुरु केला जाईल. या कक्षांतर्गत सैनिकी प्रशिक्षण दिले जाणार आहे. कोल्हापूर, सांगलीमध्ये या कक्षाच्या शाखा सुरु केल्या जातील. त्यासह शहीद जवानांच्या कुटुंबीयांना शिक्षण, रोजगार, आदी विविध पातळ्यांवर मदत केली जाणार आहे. 'एनसीसी'च्या मानद मेजर रुपा शहा म्हणाल्या, विद्यापीठाने मिलिटरी अकॅडमी, फायरिंग रेंज सुरु करावी. मुंबई आणि सोलापूर विद्यापीठांतर्फे एनसीसीच्या छात्रसैनिकांना दहा गुण दिले जातात. त्या दृष्टीने शिवाजी विद्यापीठाकडून कार्यवाही व्हावी.

या पत्रकार परिषदेस प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक प्रा. ए. एम. गुरव, केंद्रीय रोजगार केंद्राचे समन्वयक डॉ. जी. एस. राशीनकर, 'एनसीसी'चे अधिकारी अमित रेडेकर उपस्थित होते.

## विद्यापीठात मे महिन्यात रोजगार मेळावा

विद्यापीठातील कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र व केंद्रीय रोजगार कक्षातर्फे दि. १९ मे रोजी कौशल्य व रोजगार महामेळावा घेण्यात येणार आहे, असे कुलगुरु डॉ. शिंदे आणि समन्वयक डॉ. गुरव, डॉ. राशीनकर यांनी सांगितले. डॉ. शिंदे म्हणाले, या मेळाव्यात राज्यभरातील ५० हून अधिक कंपन्या सहभागी होतील. त्यांच्याद्वारे दोन हजार रोजगार उपलब्ध होण्याची शक्यता आहे. विविध शंभरहून अधिक कौशल्ये विद्यार्थ्यांना देण्याचा मानस आहे. डॉ. गुरव म्हणाले, गेल्या दोन वर्षांत विद्यापीठाने ७४ हजार विद्यार्थी-विद्यार्थिनींना कौशल्ये दिली आहेत. या वर्षीच्या मेळाव्यासाठी नोंदणी, अधिक माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. डॉ. राशीनकर म्हणाले, विद्यापीठाचा अधिकृत माजी विद्यार्थी संघ कार्यान्वित झाला आहे. याअंतर्गत तीन हजार जणांनी नोंदणी केली आहे. या मेळाव्यादिवशी दहा हजार माजी विद्यार्थ्यांची नोंदणी केली जाईल.

## कामचुकारांवर कारवाई करणार

विद्यापीठातील विविध अधिविभागांतील काही अधिकारी आणि कर्मचाऱ्यांकडून कामचुकारपणा, शिस्तभंग केला जात आहे. याबाबत विद्यापीठ प्रशासन काय करणार? असा प्रश्न पत्रकारांनी उपस्थित केला. यावर विद्यापीठामध्ये शिस्तभंग, कामचुकारपणा करणाऱ्यांवर कारवाई केली जाईल, असे कुलगुरु डॉ. शिंदे यांनी सांगितले.

## 'एनसीसी'च्या मानद कर्नलपदी देवानंद शिंदे

नसीर अत्तार



कोल्हापुरात गुरुवारी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांना कोल्हापूर ग्रुपचे एनसीसी प्रमुख ब्रिगेडियर पी. एस. राणा यांच्या हस्ते मानद कर्नलपदाचे सन्मानपत्र, एनसीसी बॅटन प्रदान करण्यात आले. यावेळी डावीकडून विलास नांदवडेकर, डी. टी. शिर्के, एम. एम. चौधरी, अमित रेडेकर, रुपा शहा उपस्थित होत्या.

कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांना राष्ट्रीय छात्रसेनेचे (एनसीसी) 'कर्नल कमांडंट' हे मानद कर्नलपद गुरुवारी बहाल करण्यात आले. शिवाजी विद्यापीठातील 'गार्ड ऑफ ऑनर' या विशेष सोहळ्यात त्यांना कोल्हापूर ग्रुपचे एनसीसी प्रमुख ब्रिगेडियर पी. एस. राणा यांनी मानद कर्नलपदाचे केंद्रीय मुख्यालयाकडून प्राप्त झालेले सन्मानपत्र, एनसीसी बॅटन प्रदान केले. ब्रिगेडियर राणा म्हणाले, प्रशिक्षित व देशप्रेमी नागरिक निर्माण करण्यासाठी 'एनसीसी' महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे. कार्यक्रमास परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, निवृत्त कर्नल थोरात, आदी उपस्थित होते. कर्नल एम. एम. चौधरी यांनी स्वागत केले. प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी कुलगुरु डॉ. शिंदे यांचा परिचय करून दिला. मानद मेजर रुपा शहा यांनी सन्मानपत्राचे वाचन केले. प्रा. संध्या जाधव यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.

## सवलतीच्या दहा गुणांसाठी पाठपुरावा करणार : शिंदे

एनसीसी भवनसाठी जागा देणे, पदवी पातळीवर विशेष अभ्यासक्रम सुरु करणे यांद्वारे 'एनसीसी'च्या उपक्रमांना चालना देण्याचे काम विद्यापीठाने केले आहे. त्यामुळेच 'एनसीसी'च्या मानद कर्नल पदाचा बहुमान मला मिळाल्याचे कुलगुरु डॉ. शिंदे यांनी सांगितले. ते म्हणाले, क्रीडा स्पर्धा व 'एनएसएस'मध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांप्रमाणे एनसीसीच्या छात्रसैनिकांना दहा गुणांची सवलत देण्याबाबत शासनाकडे पाठपुरावा करू. स्वातंत्र्यदिन, प्रजासत्ताक दिनानिमित्त विद्यापीठात छात्रसैनिकांचे संचलन घेतले जाईल.

## छात्रसैनिकांकडून मानवंदना

कुलगुरु डॉ. शिंदे यांच्या कक्षापासून मुख्य प्रशासकीय इमारतीसमोरील कार्यक्रम स्थळापर्यंत त्यांना ब्रिगेडियर राणा आणि कर्नल चौधरी यांनी सन्मानपूर्वक पाचारण केले. त्या ठिकाणी एनसीसीचे छात्र, बँडद्वारे मानद कर्नल डॉ. शिंदे यांना मानवंदना देण्यात आली. 'गार्ड ऑफ ऑनर' हा सोहळा पाहण्यासाठी विद्यार्थी, प्राध्यापक, अधिकारी उपस्थित होते.

पुण्यनगरी

# एनसीसी विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठात स्वतंत्र सेल

## – कुलगुरू देवानंद शिंदे

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
राष्ट्रीय छात्र सेनेच्या (एनसीसी) विद्यार्थ्यांना आर्मी, नेव्ही आणि हवाई दल अशा राष्ट्र सेवा क्षेत्रांमध्ये नोकरीच्या मोठ्या संधी उपलब्ध आहेत. या संधी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना उपलब्ध होण्यासाठी विद्यापीठामार्फत एनसीसी विभागासाठी खास स्वतंत्र्य सेल उभा करण्याचा मानस आहे. तसेच आर्मी एनसीसी अधिकाऱ्यांच्या मदतीने एनसीसी विद्यार्थ्यांसाठी खास ट्रेनींग उपक्रम राबवले जातील, अशी माहिती शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.देवानंद शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे यांना गुरूवारी राष्ट्रीय छात्र सेनेतर्फे मानद कर्नलपद प्रदान करण्यात आले. या सोहळ्यानंतर पत्रकार परिषदेत कुलगुरू शिंदे यांनी संवाद साधला. यावेळी प्रकुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डी. आर. मोरे, महेश काकडे, मेजर रूपा शहा आदी उपस्थित होते.

यावेळी कुलगुरू शिंदे म्हणाले, एनसीसीचे मानद कर्नल पद मिळाल्यामुळे माझी जबाबदारी वाढली आहे. विद्यापीठाने एनसीसीकडे विद्यार्थ्यांचा ओढा वाढावा यासाठी प्रयत्न केले आहेत. त्यामध्ये एनसीसी भवन उभारणी सारख्या उपक्रमांचा समावेश आहे. अन्य क्षेत्रातील संधीप्रमाणे एनसीसी विद्यार्थ्यांनाही आर्मी, नेव्ही सारख्या ठिकाणी नोकरीच्या संधी आहेत. त्यासाठी सेल उभारणी करणार आहे. याचा लाभ विद्यार्थ्यांना होईल. ▸▸ पान २ वर

### कामचुकारांवर कारवाई



शिवाजी विद्यापीठाच्या काही विभागातील कामचुकार कर्मचाऱ्यांना विभाग प्रमुख पाठीशी घालतात. त्यांच्यावर कारवाई कधी होणार? यावर उत्तर देताना कुलगुरू यांनी संबंधित विभागाची कर्मचाऱ्यांची चौकशी करून दोषींवर त्वरित कारवाई करू, असे आश्वासन पत्रकारांना दिले. त्यासाठी लवकरच सर्व विभागप्रमुखांकडून कर्मचाऱ्यांच्या कामाचा आढावा घेतला जाईल, असे स्पष्ट करण्यात आले.
– कुलगुरू देवानंद शिंदे

27 APR 2018

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कुलगुरू डॉ. शिंदे यांना कर्नलपद प्रदान

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शिंदे यांना राष्ट्रीय छात्रसेनेचे (एन.सी.सी.) मानद कर्नलपद समारंभपूर्वक प्रदान करण्यात आले. ब्रिगेडियर राणा यांच्या हस्ते कुलगुरू डॉ. शिंदे यांना मानद कर्नलपदाचे केंद्रीय मुख्यालयाकडून प्राप्त सन्मानपत्र व एनसीसी बॅटन प्रदान करण्यात आले. तत्पूर्वी, ब्रिगेडियर राणा आणि कर्नल चौधरी यांनी कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या कक्षापासून मुख्य प्रशासकीय इमारतीसमोरील कार्यक्रम स्थळापर्यंत त्यांना सन्मानपूर्वक पाचारण केले. तेथे एनसीसीचे छात्र व एनसीसी बँडने मानद कर्नल कुलगुरू डॉ. शिंदे यांना मानवंदना दिली.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, शिवाजी विद्यापीठाने एनसीसीसाठी आपल्या परिसरात मोठी जागा उपलब्ध करून देऊन एनसीसीच्या उपक्रमांना चालना देण्याचे काम चालविले आहे. त्याचप्रमाणे पदवी स्तरावर एनसीसी हा विशेष लष्करी अभ्यासक्रमही विद्यापीठ कार्यक्षेत्रात सुरू करण्यात आला आहे. विद्यापीठात ज्याप्रमाणे युपीएससी, एमपीएससी यासारख्या स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शन केले जाते; त्याच धर्तीवर एसएसबी परीक्षांसाठीही मार्गदर्शन कक्ष सुरू करण्यात येईल.




**कोल्हापूर : कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांना कर्नल पदाचे सन्मानपत्र प्रदान करताना ब्रिगेडियर पी. एस. राणा. सोबत इतर मान्यवर.**

ब्रिगेडियर राणा म्हणाले, एनसीसी ही भारतीय लष्करापेक्षाही अधिक युवकांची संख्या असणारी शिस्तबद्ध संघटना आहे. प्रशिक्षित व देशप्रेमाने भारित नागरिक निर्माण करण्यासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे. विद्यापीठाच्या सामाजिक, सांस्कृतिक उपक्रमांमध्ये सहभाग प्राप्त होऊन नूतन मानद कर्नल कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवाजी विद्यापीठ परिक्षेत्रात एनसीसीची जोमाने वृद्धी होईल.

कर्नल एम. एम. चौधरी यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी कुलगुरू डॉ. शिंदे यांचा परिचय करून दिला. मानद मेजर रूपा शहा यांनी सन्मानपत्राचे वाचन केले. प्रा. संध्या जाधव यांनी सूत्रसंचालन केले, कुलसचिव डॉ. विलास नांदवेडकर यांनी आभार मानले.

यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, निवृत्त कर्नल थोरात आदी उपस्थित होते.

# एनसीसी विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठात स्वतंत्र सेल

**(पान १ वरून)** क्रीडा विद्यार्थ्यांप्रमाणे एनसीसी विद्यार्थ्यांनाही परिक्षांमधे १० गुण मिळवेत यासाठी पाठपुरावा करणार आहे. तसेच एनसीसीच्या माध्यमातून विद्यापीठ विविध उपक्रम राबवणार आहे. त्यामध्ये सातारा येथे शहीद कर्नल संतोष महाडिक स्मृती केंद्राद्वारे शहिदांच्या कुटुंबीयांना शैक्षणीक सहकार्य, जिल्हास्तरीय उपकेंद्रामार्फत अन्य उपक्रम राबवण्याचा विद्यापीठाचा मानस आहे. दरम्यान मेजर रुपा शहा यांच्या माध्यमातून जिल्हा एनसीसीमार्फत कुलगुरू शिंदे यांच्याकडे विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. यात कुलगुरूंनी स्वतःच्या नावाच्या नेमप्लेटवर मानद कर्नल ही पदवी लावावी, मिलेट्री अॅकॅडमी सुरू करुन यशस्वी एनसीसी विद्यार्थ्यांचा सत्कार करावा, २०१८-१९ पासून एनसीसी विद्यार्थ्यांना १० मार्क मिळावेत, तसेच विद्यापीठात फायरींग रेंज उपलब्ध करुन द्यावी,अशी मागणी करण्यात आली.

### विद्यापीठात कौशल्य रोजगार महामेळावा

दरम्यान, विद्यापीठाच्या उद्योजगता विकास केंद्राच्या माध्यमातून आगामी १९ मे रोजी अधिविभाग इमारत, लोक कला केंद्र येथे रोजी कौशल्य व रोजगार महामेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये आयटी, अभियांत्रिकी, सेवा अशा विविध क्षेत्रातील ५० हून अधिक खासगी कंपन्या सहभागी होणार असुन किमान २ हजार रोजगार उपलब्ध होणार आहेत. तसेच यावेळी ३० कौशल्य प्रशिक्षकांच्या माध्यमातून १०० कौशल्ये देण्याचा मानस विद्यापीठाचा असल्याची माहिती प्रा. ए. एम. गुरव, जी. एस. राशीनकर यांनी पत्रकार परिषदेदरम्यान दिली.

21 APR 2018

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात एस.एस.बी. मार्गदर्शन कक्ष सुरू करणार

## कुलगुरू डॉ. शिंदे : ब्रिगेडियर पी.एस. राणा यांच्या हस्ते राष्ट्रीय छात्र सेनेचे मानद कर्नलपद प्रदान

कोल्हापूर : प्रतिनिधी

सेनादलात अधिकारीपदी भरतीसाठी आवश्यक असणाऱ्या सर्व्हिस सिलेक्शन बोर्ड (एस. एस.बी.) परीक्षांसाठी शिवाजी विद्यापीठात मार्गदर्शन कक्ष सुरू करणार असल्याचे प्रतिपादन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी येथे केले.

कुलगुरू डॉ. शिंदे यांना गुरुवारी राष्ट्रीय छात्र सेनेचे (एन.सी.सी.) मानद कर्नलपद प्रदान करण्यात आले. या पदस्वीकृती कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, ब्रिगेडियर पी. एस. राणा, कर्नल एम.एम. चौधरी, मानद मेजर रूपा शहा व कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर होते.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, शिवाजी विद्यापीठाने एनसीसीसाठी आपल्यापरिसरातमोठीजागाउपलब्ध करून देऊन एनसीसीच्या उपक्रमांना चालना देण्याचे काम चालविले आहे. त्याचप्रमाणे पदवी स्तरावर एनसीसी हा विषय लष्करी अभ्यासक्रमातही विद्यापीठ कार्यक्षेत्रात सुरू करण्यात आला आहे. विद्यापीठात ज्याप्रमाणे यूपीएससी, एमपीएससी यासारख्या स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शन केले जाते. त्याच धर्तीवर एस.एस.बी. परीक्षांसाठीही मार्गदर्शन कक्ष सुरू करण्यात येईल. १५ ऑगस्ट व २६ जानेवारी या राष्ट्रीय दिनानिमित्त विद्यापीठ प्रांगणात एनसीसीची परेड आयोजित करण्यासंदर्भातही एनसीसीच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात येईल. एनसीसीमध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने समाविष्ट होण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना आणि क्रीडा स्पर्धांत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांप्रमाणे या विद्यार्थ्यांना काही सवलती किंवा अधिक गुण देता येतील का, याबाबत प्रयत्न करण्याचा मानसही त्यांनी व्यक्त केला.

यावेळी ब्रिगेडियर पी. एस. राणा म्हणाले, एनसीसी ही लाखो युवकांची संख्या असणारी शिस्तबद्ध संघटना असून, प्रशिक्षित व देशप्रेमाने प्रेरित नागरिक निर्माण करण्यासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे. या संघटनेच्या कार्याला बळकटी प्राप्त होण्यासाठी शैक्षणिक संस्था, विद्यापीठे आदी व्यवस्थांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण ठरते. त्या दृष्टीने आजचा कार्यक्रम अत्यंत उपयुक्त आहे. विद्यापीठाच्या सामाजिक, सांस्कृतिक उपक्रमांमध्ये सहभाग प्राप्त होऊन नूतन मानद कर्नल कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवाजी विद्यापीठ परिक्षेत्रात एनसीसीची जोमाने वृद्धी होईल, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.




कोल्हापूर : कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांना एनसीसीच्या मानद कर्नलपदाचे सन्मानपत्र प्रदान करताना ब्रिगेडियर पी. एस. राणा. सोबत डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. डी. टी. शिर्के, कर्नल एम. एम. चौधरी, मानद मेजर रूपा शहा आदी.

(छाया : पप्पू अत्तार)

ब्रिगेडियर राणा यांच्या हस्ते कुलगुरू डॉ. शिंदे यांना मानद कर्नलपदाचे केंद्रीय मुख्यालयाकडून प्राप्त सन्मानपत्र व एनसीसी बॅटन प्रदान करण्यात आले.

तत्पूर्वी, ब्रिगेडियर राणा आणि कर्नल चौधरी यांनी कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या कक्षापासून मुख्य प्रशासकीय इमारतीसमोरील कार्यक्रम स्थळापर्यंत त्यांना सन्मानपूर्वक पाचारण केले. तेथे एनसीसीचे छात्र व एनसीसी बँड यांच्याकडून मानद कर्नल कुलगुरू डॉ. शिंदे यांना मानवंदना देण्यात आली.

कर्नल एम. एम. चौधरी यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी कुलगुरू डॉ. शिंदे यांचा परिचय करून दिला. मानद मेजर रूपा शहा यांनी यावेळी सन्मानपत्राचे वाचन केले. प्रा. संध्या जाधव यांनी सूत्रसंचालन केले तर कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.

यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, निवृत्त कर्नल थोरात यांच्यासह विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांचे सदस्य, अधिष्ठाता, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी व सेवक, विद्यार्थी, एनसीसी छात्र व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

27 APR 2018

जनसंपर्क कक्ष
सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात 'एसएसबी' मार्गदर्शन कक्ष : डॉ. शिंदे

## 'एनसीसी'चे मानद कर्नलपद कुलगुरूंना सन्मानपूर्वक प्रदान

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २६ : सेनादलात अधिकारीपदी भरतीसाठी आवश्यक असणाऱ्या सर्व्हिस सिलेक्शन बोर्ड (एसएसबी) परीक्षांसाठी शिवाजी विद्यापीठात मार्गदर्शन कक्ष सुरू करण्याचा मनोदय कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी व्यक्त केला. राष्ट्रीय छात्र सेनेचे (एनसीसी) मानद कर्नलपद पदस्वीकृतीनंतर मनोगत व्यक्त करताना ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, शिवाजी विद्यापीठाने एनसीसीसाठी परिसरात मोठी जागा उपलब्ध करून देऊन एनसीसीच्या उपक्रमांना चालना दिली आहे. पदवी स्तरावर एनसीसी हा विशेष लष्करी अभ्यासक्रमही

पान २ वर »

### कुलगुरू डॉ. शिंदेंना निवेदन

मेजर रूपा शहा यांच्या माध्यमातून जिल्हा एनसीसीतर्फे कुलगुरू शिंदे यांना निवेदन दिले. यात कुलगुरूंनी स्वतःच्या नावाच्या नेमप्लेटवर मानद कर्नल ही पदवी लावावी, सैन्यदलाची अ‍ॅकॅडमी सुरू करून यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करावा, २०१८-१९ वर्षापासून एनसीसीच्या विद्यार्थ्यांना १० गुण मिळावेत, विद्यापीठात फायरिंग रेंज उपलब्ध करून द्यावी, अशा मागण्या केल्या.

# विद्यापीठात 'एसएसबी' मार्गदर्शन कक्ष : डॉ. शिंदे

» पान १ वरून

विद्यापीठ कार्यक्षेत्रात सुरू केला. विद्यापीठात ज्याप्रमाणे युपीएससी, एमपीएससी यांसारख्या स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शन केले जाते; त्याच धर्तीवर 'एसएसबी' परीक्षांसाठीही मार्गदर्शन कक्ष सुरू करण्यात येईल. १५ ऑगस्ट व २६ जानेवारी या राष्ट्रीय दिनांच्या प्रसंगी विद्यापीठ प्रांगणात एनसीसीची परेड घेण्यासंबधी प्रयत्न सुरू आहेत. एनसीसीत विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविण्यासाठी काही सवलती,अधिक गुण प्रदान करता येतील का?, या दृष्टीने प्रयत्न करण्याचा मानसही त्यांनी व्यक्त केला. ब्रिगेडियर पी.एस. राणा आणि कर्नल चौधरी यांनी कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या कक्षापासून मुख्य प्रशासकीय इमारतीसमोरील कार्यक्रम स्थळापर्यंत त्यांना सन्मानपूर्वक पाचारण केले. तेथे एनसीसीचे छात्र व एनसीसी बँडकडून डॉ. शिंदे यांना मानवंदना दिली.




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांना एनसीसीच्या मानद कर्नलपदाचे सन्मानपत्र गुरुवारी प्रदान करताना ब्रिगेडियर पी. एस. राणा. शेजारी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कर्नल एम. एम. चौधरी, मानद मेजर रूपा शहा.

कर्नल एम.एम. चौधरी यांनी स्वागत केले. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी कुलगुरू डॉ. शिंदे यांचा परिचय करून दिला. मानद मेजर रुपा शहा यांनी सन्मानपत्राचे वाचन केले. प्रा. संध्या जाधव यांनी सूत्रसंचालन केले, तर कुलसचिव डॉ. विलास नांदवेडकर यांनी आभार मानले. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी.आर. मोरे, निवृत्त कर्नल थोरात आदी उपस्थित होते.

27 APR 2018

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात एस.एस.बी. मार्गदर्शन कक्ष स्थापणार

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचा मानस : मानद कर्नलपदाचे सन्मानपत्र व एनसीसी बॅटनने शिवाजी विद्यापीठ प्रमुखांचा गौरव

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात पदवीपासूनच विद्यार्थ्यांना एनसीसीचा अभ्यासक्रम शिकवला जातो. तसेच एनसीसी भवनसाठी विद्यापीठाने स्वतःची जागा दिली त्यामुळेच आज राष्ट्रीय छात्र सेना अर्थात एनसीसी मध्ये 'कर्नल कमांडंट' या मानद कर्नलपदाचा बहुमान मला मिळाला. सेनादलांत अधीकारीपदी भरतीसाठी आवश्यक असणाऱ्या सर्व्हीस सिलेक्शन बोर्ड (एस.एस.बी.) परीक्षांसाठी शिवाजी विद्यापीठात मार्गदर्शन कक्ष सुरू करण्याचा मानस असल्याचे, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे सांगितले.

शिवाजी विद्यापीठातील प्रांगणात ब्रिगेडियर राणा यांच्या हस्ते कुलगुरू डॉ. शिंदे यांना मानद कर्नलपदाचे केंद्रीय मुख्यालयाकडून प्राप्त सन्मानपत्र व एनसीसी बॅटन प्रदान करण्यात आले. तत्पूर्वी, ब्रिगेडियर राणा आणि कर्नल चौधरी यांनी कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या कक्षापासून मुख्य प्रशासकीय इमारतीसमोरील कार्यक्रम




**कोल्हापूर : कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांना मानद कर्नलपदाचे केंद्रीय मुख्यालयाकडून प्राप्त सन्मानपत्र व एनसीसी बॅटन प्रदान करताना ब्रिगेडियर पी. एस. राणा. सोबत प्र. कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. रुपा शहा, कर्नल एम. एम. चौधरी आदी.**

स्थळापर्यंत त्यांना सन्मानपूर्वक पाचारण केले. तेथे एनसीसीचे छात्र व एनसीसी बँड यांच्याकडून मानद कर्नल कुलगुरू डॉ. शिंदे यांना मानवंदना देण्यात आली.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, पश्चिम महाराष्ट्रात कोल्हापूर सैनिकांचे माहेरघर म्हणून ओळखले जाते. स्वातंत्र्योत्तर काळापासून शेकडो सैनिकांनी देशासाठी प्राणाची आहुती दिली आहे. देशाच्या नकाशात सातारा, कोल्हापूरची शहीद जिल्हा म्हणून ओळख आहे. त्यामुळे येथे एखाद्या अत्याधुनिक केंद्र स्थपना होण्याची गरज आहे. विद्यापीठात ज्याप्रमाणे युपीएससी, एमपीएससी यांसारख्या स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शन केले जाते; त्याच धर्तीवर एसएसबी परीक्षांसाठीही मार्गदर्शन कक्ष सुरू करण्यात येईल. १५ ऑगस्ट व २६ जानेवारी या राष्ट्रीय दिनांच्या प्रसंगी विद्यापीठ प्रांगणात एनसीसीची परेड आयोजित करण्यासंदर्भातही एनसीसीच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात येईल.

ब्रिगेडियर पी.एस. राणा म्हणाले, एनसीसी ही भारतीय लष्करापेक्षाही अधिक युवकांची संख्या असणारी शिस्तबद्ध संघटना आहे. या संघटनेच्या कार्याला बळकटी प्राप्त होण्यासाठी शैक्षणिक संस्था, विद्यापीठे आदी व्यवस्थांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण ठरते. त्या दृष्टीने आजचा कार्यक्रम अत्यंत उपयुक्त आहे. विद्यापीठाच्या सामाजिक, सांस्कृतिक उपक्रमांमध्ये सहभाग प्राप्त होऊन नूतन मानद कर्नल कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवाजी विद्यापीठ परिक्षेत्रात एनसीसीची जोमाने वृद्धी होईल, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

कर्नल एम.एम. चौधरी यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी कुलगुरू डॉ. शिंदे यांचा परिचय करून दिला. मानद मेजर डॉ.रुपा शहा यांनी सन्मानपत्राचे वाचन केले. प्रा. संध्या जाधव यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवेडकर यांनी आभार मानले.

यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, एनसीसीप्रमुख डॉ. डी. के. गायकवाड, क्रिडा विभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी.आर. मोरे, निवृत्त कर्नल थोरात यांच्यासह विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांचे सदस्य, अधिष्ठाता, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी व सेवक, विद्यार्थी, एनसीसी छात्र व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.